# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०१९-२०२० या वर्षातील कार्याचा अहवाल
## [वर्ष ८५ वे]

**[प्रास्ताविक:-** अमृतमहोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करणारी आणि एकेकाळी बृहन्मुंबईतील बहुतेक सर्वच देशी खेळांचे तसेच सुमारे ८००-८५० संलग्न हुतुतु/कबड्डी मंडळे, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था, व्यायाम संस्थांचे तसेच पोस्ट, तारखाते, गिरण्या, रेल्वे, बँका, कारखाने, पोलीस अशा विविध व्यावसायिक संस्थांचे खेळविषयक नियमन करणारी 'मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ' ही संस्था 'एक खेळ-एक संस्था' [वन गेम वन फेडरेशन] या तत्वामुळे या संस्था आणि देशी खेळ जरी बाजूला झाले तरी आजही आपल्या ध्येयान्वेषी कार्यामुळे शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रात ताठ मानेने उभी आहे. दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन स्थापन झालेल्या संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्टयपूर्ण असे योगदान दिलेले आहे. त्यातुनच गेल्या ८३ वर्षात संस्थेने असंख्य खेळाडू, कार्यकर्ते, संशोधन मार्गदर्शक, तज्ञ आणि शिक्षक निर्माण केलेले आहेत. आजही मंडळाचे 'क्रीडाविश्व' हे त्रैमासिक, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, फिटनेस सेंटर आणि मंडळाकडून प्रतिवर्षी घेतल्या जाणा-या आणि पुरस्कृत केल्या जाणा-या विविध खेळांच्या भव्य स्पर्धा तसेच आयोजित करण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वैशिष्टयपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.]

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०१९-२०२० या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. वर्षभरातील कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

**१.१ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षे कालावधीच्या दुस-या तुकडीच्या अभ्यासक्रमाच्या ४१ व्या आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या २२ व्या [२०१९-२१] शैक्षणिक वर्षाची सुरूवात दि.३० सप्टेंबर,२०१९ रोजी झाली. त्यादिवशी आयोजित करण्यात आलेला उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.संजय बाबुराव शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. बी.पी.एड. अभ्यासक्रमास १०० पदवीधरांनी [७४ पूरूष व २६ महिला] तर एम.पी.एड्. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमास एकूण २५ विद्यार्थ्यांना [१४ पूरूष व ११ महिला] प्रवेश दिला गेला. सदर प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाद्वारे पार पाडण्यात आली. बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाची सुरूवात दि.२२ जुलै २०१९ रोजी झाली.

**१.२ कुलपध्दती**

अधिक प्रभावी व परिणामकारकरित्या प्रशिक्षण देण्यासाठी आणि व्यवस्थापनदृष्टया सोयिस्कर व्हावे म्हणून ऑक्टोंबर, २०१९ महिन्यात बी.पी.एड. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमाच्या सर्व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांचे आनंद, प्रताप, संग्राम व विजय अशा चार तर महिलांचे प्रगती व शक्ती अशा दोन समतुल्य कुलांमध्ये [गटांमध्ये] त्यांचे शैक्षणिक, क्रीडा आणि कला यातील संपादन लक्षांत घेऊन विभाजन करण्यात आले.

**१.३ आंतरराष्ट्रीय योग दिन-**

दि.२१ जून, २०१९ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग' दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व शिक्षक सहभागी झाले होते.

**१.४ पायी पर्यटन/गिर्यारोहण/ शैक्षणिक भेटी/सहल**

अभ्यासेतर कार्यक्रमांच्या आयोजन व प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून दि.२ ऑगष्ट, २०१९ रोजी नेरळ ते माथेरान या निसर्गरम्य ठिकाणी पायीपर्यटन व गिर्यारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी बीपीएड अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी निसर्गाचा आनंद मनसोक्त लुटून नेरळ ते माथेरान व परत हे अंतर पायी चालून आपल्या शारीरिक सक्षमतेची चुणुक पटवून दिली.

दि.२१ नोव्हेंबर २०१९ रोजी बीपीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी बालेवाडी, पुणे येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले.

**१.५ देशभक्तीपर गायन प्रशिक्षण व आंतरकुल समुहगान स्पर्धा**

ऑगष्ट महिन्यात दि.३० ऑगष्ट रोजीप्रसिध्द गायक श्री.सोमनाथ परब यांचे मार्गदर्शनाखाली बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता 'सामायिक ऐक्य पंधरवडा' निमित्त समुहगीत गायन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच दि.१५ ऑगष्ट, २०१९ रोजी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.राजन वेळुकर, सचिव मा.श्री.दिपक शेटे व शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर देशभक्तीपर समुहगीतांच्या आंतरकुल स्पर्धा पार पडल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन विविध वेश परिधान करून प्रभावीरित्या देशभक्तीपर समुहगीते सादर केली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दि. २२. डिसेंबर २०१९ रोजी प्रसिध्द संगितकार कै.वसंत देसाई यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवाजी पार्क, दादर येथे 'स्वरांजली' कार्यक्रमात सक्रिय भाग घेऊन समुह गीते गायली.

**१.६ राष्ट्रीय दिन आयोजन:-**

प्रतिवर्षाप्रमाणे दि.१५ ऑगष्ट २०१९ या दिवशी 'स्वातंत्र दिन' तर दि.२६ जानेवारी २०२० रोजी 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला.

**१.७ शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धा**

दि.५ सप्टेंबर,२०१९ रोजी शिक्षक दिनानिमित्त बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर दिवशी सर्व महाविद्यालयीन कामकाज मध्यान्हापर्यंत विद्यार्थ्यांनी व्यवस्थीत सांभाळून आपल्या कार्यक्षमतेची चुणूक पटवून दिली. शेवटी सदर उपक्रमात उत्कृष्ठ काम करणा-या विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले-

**१.८ वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन-**

दि.१४ ऑक्टोंबर २०१९ या दिवशी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यायात **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, संस्थेचे सचिव मा.श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर व महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते. माजी राष्ट्रपती स्व.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून समारंभाची सुरूवात झाली. प्रथम काही विद्यार्थ्यांना अब्दूल कलाम यांच्यावरील कवितांचे वाचन झाले. त्यानंतर राष्ट्रपती स्व.अब्दूल कलाम यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

**१.९ राष्ट्रीय एकता दिन** - स्व.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त दि.३१ ऑक्टोंबर २०१९ रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस' याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर तसेच महाविद्यालयासचे सर्व शिक्षक उपस्थित होते. समारंभाची सुरूवात स्व. सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होतो. नंतर डॉ.गो.वि. पारगांवकर यांनी सरदार पटेल व राष्ट्रीय एकता यावर आपले विचार मांडले. आपल्या अध्यक्षिय भाषणात मा.श्री.संजय शेटे साहेबांनी त्यांना लोक लोहपुरूष असे का संबोधतात व राष्ट्रीय एकता विषयी स्व.सरदार यांचे विचार काय होते याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. यानंतर डॉ.ढाकणे यांनी राष्ट्रीय एकता दिवसाच्या शपथेचे वाचन केले. राष्ट्रगीतानंतर राष्ट्रीय एकता दिवसाची सांगता झाली.

**१.१० भारतीय संविधान दिनाचे आयोजन**

दि.२६ नोव्हेंबर,२०१९ रोजी संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात **'संविधान प्रास्ताविक वाचन आणि भित्तीपत्रक प्रदर्शन'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**१.११ बालवीर व वीरबाला प्रशिक्षण शिबिर-**

बीपीएड [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर, २०१९ या कालावधीत साने गुरूजी राष्टीय स्मारक, वडघर, ता.माणगांव, जिल्हा रायगड येथील निसर्गरम्य परिसरात ६ दिवसांचे स्काऊट व गाईड प्रशिक्षण शिबिर आयोजित

करण्यात आले. सदर शिबिराला संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे व जनरल सेक्रेटरी श्री. दिपक शेटे, तसेच कार्यकारी सदस्य सर्वश्री शामराव मोरे , रघूनाथ गुरव, श्री.रमेश शेटे इ. मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांनी केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले.

**१.१२ आंतर-शालेय हिंद करंडक स्पर्धा [कबड्डी, खो-खो, लंगडी]**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदिखील संस्थेच्यावतीने महाविद्यालयाने घेतलेल्या आंतरशालेय हिंदकरंडक स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्या. दि. ३ ते ५ जानेवारी, २०२० या कालावधीत घेतल्या गेलेल्या कबड्डी, खो-खो व लंगडी या खेळांच्या सदर स्पर्धेत विविध शाळांच्या १६३२ मुला-मुलींनी भाग घेतला होता.

**१.१३ आंतरराष्ट्रीय परिषदेत विद्यार्थी व शिक्षक सहभाग**

दि.९ ते ११ जानेवारी २०२० या कालावधीत मणिपाल विद्यापीठ, जयपूर यांनी 'शारीरिक शिक्षण व क्रीडा विज्ञान' या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे २५ विद्यार्थी व तीन शिक्षकांनी भाग घेवून खालीलप्रमाणे विविध शोधनिबंध वसादर करून लक्षणीय शैक्षणिक कार्य केले-

- **List of students presented paper :**

| Sr.No. | Name of the Students | Title of the Paper |
|---|---|---|
| 1 | • Yashraj Deshmukh<br>• Kiran Pawar<br>• Krishna Kamble<br>• Dipali Kalamkar | A Comparative Study of Emotional Maturity and Scocial Competence of Boys and Girls of School Volleyball Players of Mumbai |
| 2 | • Tejal K Solanki<br>• Priyanka Meher<br>• Siddhant Pednekar<br>• Dr.N.O Joshi | Effect of Pranayama on Anxiety of Physical Education Femal Students |
| 3 | • Tanmay Ghanekar<br>• Sameer Patil<br>• Rakesh Joiel<br>• Samruddhi Pawar | Effect of Plyometric Training Programme on Explosive Power of Artistic Gymnasts |
| 4 | • Dipali Patil<br>• Manasi Kangutkar<br>• Brinal Dias<br>• Uday Patil<br>• Dr.R.N. Shelke | Effect of Mix Drill Training on Stress of School students of Mumbai |
| 5 | • Balkrishna yallamalli<br>• Shivani shahu<br>• Virendraparatp Verma<br>• Sagar pagare<br>• Dr.S.N. Chougule | Effect of Tabata Training on Physical Fitness Variables of School students |
| 6 | • Arya Gosavi<br>• Sneha Maurya<br>• Pratik Gurav<br>• Vaibhav Kadam | Effect of Laughing Exercises onVital Capacity and Physical Stress of Secondary School students |
| 7 | • Bhagyashri Bhilare<br>• Manoj Verma<br>• Danish Pathan<br>• Amol Mohandkar | Effect of Yogic Practices on General Wellbeing of Senior Wring Girls of national Cadet Corps |
| 8 | • Manoj Verma<br>• Danish Pathan<br>• Dr.K.J. Maru | Effect of Pranayama and Mudras on Cardiovascular Endurance and Peak Expiratory Flow Rate of Junior College Students |
| 9 | • Dipali Patil<br>• Shivani sahu<br>• Dr.G.K. Dhokrat | Effect of Traditional Exercise Training Programme on Mental health of Junior college Boys |
| 10 | • Bhagyashri Bhilare<br>• Amol Mohandkar<br>• Dr.N.O. Joshi | Effect of specific Training Programme on Motor Fitness componetns and Aggression of Kabaddi Players |

**१.१४ फिटनेस ट्रेनिंग व मॅनेजमेंटचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम–**

अहवालसाली महाविद्यालयाने 'गायो फिटनेस ॲकॅडेमी' यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई, विद्यापीठ मान्यताप्राप्त फिटनेस ट्रेनर व फिटनेस सेंटर मॅनेटमेंट प्रमाणपत्र अभ्यासक्रम देशात विविध ९ राज्यात ११ ठिकाणी म्हणजे मुंबई, दिल्ली, आसाम,(गोहाती), कलकत्ता, (त्रिशुल, कोची, कॅलीकट), मिझोराम (अपझॉल), बंगलोर, बेळगांव, गोवा, छत्तीसगड (रायपूर) येथे राबविण्यात आले त्यातुन संस्थेस अहवालसाली रू.७,३७०००/– [सात लाख सदतिस हजार फक्त]इतका निधी उपलब्ध झाला.

**१.१५ आंतर–शालेय लेझीम स्पर्धा:–**

प्रतिवर्षीप्रमाणे मंडळाच्यावतीने कै. दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या आंतर शालेय लेझीम स्पर्धा २८ जानेवारी,२०२० रोजी झाल्या. त्यात ९ शाळांच्या सुमारे ८९० मुला–मुलींनी भाग घेतला. पहिल्या तीन विजयी शाळांना संस्थेतर्फे रोख बक्षिसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली. शिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली.

स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.संजय शेटे, डॉ.डिसील्व्हा हायस्कूलच्या मुख्याध्यापिका, श्रीमती गोम्स सुसाना, जनरल सेक्रेटरी मा.श्री.दिपक बाबूराव शेटे, प्राचार्य डॉ.सिध्दार्थ कांबळे, डॉ.आंबेडकर कॉलेज, वडाळा, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, मंडळाच्या कार्यकारी समिती सदस्या श्रीमती नलिनी फडणीस, श्री.दिपक कांदळगांवकर, श्री.शामराव मोरे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

**१.१६ मराठी भाषा गौरव दिन** –

दि.१७ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांनी काव्य वाचन, कविता वाचन केले तसेच **'मराठी भाषा विकास'** यावर व्याख्याने झाली.

**१.१७ ॲथलेटिक्स प्रशिक्षण व मैदानी स्पर्धा**

बीपीएड अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना ७ दिवसांच्या कालावधीसाठी मार्च २०१९ मध्ये विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक धावन मार्गावर ॲथलेटीक्सचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच दि.५ व ७ मार्च २०२० रोजी बीपीएड द्वितीय वर्षाच्या वार्षिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावेळी उद्‌घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.संजय शेटे तर समारोप प्रसंगी जनरल सक्रेटरी श्री.दिपक शेटे इ. मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेत गुणाधिक्याने कुलास विभागून विजेतेपद मिळाले.

**१.१८ मुल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन–**

अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी Certificate Course In Personal Fitness Training(CCPFT) आणि Certificate Course In Fitness Centre Management (CCFCM) हे अल्पकालिन मुल्यवर्धित अभ्यासक्रम राबविण्यात आले त्यात बीपीएड द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन सदर दोन्ही अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले तसेच अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता कबड्डी, खो–खो, लंगडी, ॲथलेटिक्स व हॉलीबॉल या खेळांच्या पंच प्रमाणपत्र परीक्षांचे (Value added programme) आयोजन करण्यात आले.

**१.१९ आंतरराष्टीय कार्यशाळेचे आयोजन–**

दि.१२ व १३ ऑक्टोबर २०१९ रोजी महाविद्यालयाचे गायो फिटनेस ॲकॅडमीचा संयुक्त विद्यमाने 'विज्ञानाचा खेळ व खेळाडूंच्या विकासासाठी उपयोग' (Practice of Science in Sports and development of Athletes of the future) या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. सदर कार्यशाळेला Strenghth and Conditionining या विषयावर प्रभुत्व असलेले जगप्रसिध्द प्रो.इयान जेफ्रीज (Ian Jeffreys), साउथवेल्स विद्यापीठ, इंग्लंड यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यशाळेत महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी सक्रीय भाग घेतला.

**१.२० राज्यस्तरीय संशोधन कार्यशाळा–**

दि.४ व ५नोव्हेंबर २०१९ या कालावधीत दरदिवशी सकाळी १० ते सायं.५ या वेळेत (एकूण ३६ तासिका) 'शारीरिक शिक्षण व क्रीडाशास्त्राची संशोधन पध्दती व संख्याशास्त्र' या

(Research Method and Statistical Analysis) विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेला प्रो.डी.एन.सनसनवाल (निवृत्त प्राध्यापक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, इंदोर)या सुप्रसिध्द तज्ञाचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यशाळेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५०, संशोधन केंद्राच्या ३० व सर्व शिक्षकांनी सक्रीय सहभाग घेतला.

**१.२१ राज्यस्तरीय शिक्षक अधिवेशन–**

दि.८ फेब्रुवारी २०२० रोजी 'शिक्षक भारती' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाने राज्यस्तरीय शिक्षक अधिवेशन आयोजित केले. सदर अधिवेशनप्रसंगी जेष्ठ नेते मा.शरद पवारसाहेब, खासदार श्री.संजय राउत यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्गदर्शन लाभले. त्यावेळी सदर कार्यक्रमाचे यजमानपद स्विकारून स्वागताध्याक्ष म्हणून मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय बाबूराव शेटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सदर समारंभास मा.आ.कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष मा.श्री.अशोक बेलसरे, शिक्षक नेते श्री.नवनाथ गेंड इत्यादी मान्यवर तसेच सुमारे ७ ते ८ हजार शिक्षक हजर होते.

**१.२२ युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन–**

दि.२३ फेब्रुवारी २०२० रोजी भारताचे जेष्ठ नेते मा.श्री.शरद पवार साहेब यांच्याबरोबर मुंबई विद्यापीठ संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी उच्च शिक्षणाशी संबंधित विविध समस्यांवर आधारीत युवा सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी विविध महाविद्यालयाचे सुमारे ३५०० युवक-युवती सहभागी झाले होते. सदर समारंभाचे स्वागताध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय बाबूराव शेटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. समारंभास राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य समन्वय अधिकारी डॉ.अतुल साळुंखे, ॲड. अमोल मातेले, डॉ.तुकाराम शिवारे, प्राचार्य डॉ.अजय भांबरे, मा.ना.नवाब मलिक मंत्री, अल्पसंख्यांक, महाराष्ट राज्य, इ. मान्यवर उपस्थित होते.

**१.२३ विस्तार कार्य**

अहवालसाली महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी विविध संस्था आणि शाळांनी आयोजित केलेल्या खालील विविध उपक्रमात पंच / अधिकारी म्हणून भाग घेवून त्याद्वारे त्यांना स्पर्धा / उपक्रम आयोजनाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला---

१. सुविद्यालय हायस्कूल, [बोरीवली] आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धा– दि.३० जुलै,२०१९
२. मुंबई स्पोर्टस स्कूल्स असोसिएशनद्वारा आयोजित आंतरशालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा, भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई– दि.८ व ९ डिसेंबर २०१९ व दि.११, १२, व १२ जानेवारी २०२०.
३. गोखले एज्यु.सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाद्वारे आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा, कामगार मैदान, परळ– दि.१४.३.२०२०
४. महाराष्ट्र राज्य ॲमॅच्युअर अक्वॅटीक असोसिएशनद्वारा आयोजित ३८ वी संक रॉक गेटवे जलतरण स्पर्धा २०२०, गेट वे ऑफ इंडिया, मुंबई– दि.१ मार्च २०२०
५. मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशनद्वारा आयोजित टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा– दि.१४ मार्च,२०२०
६. महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालयद्वारा आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ, गेटवे ऑफ इंडिया - दि.२२ फेब्रुवारी २०२०
७. मुंबई शहर हॉलीबॉल संघटनेतर्फे आयोजित मुंबई महापौर चषक हॉलीबॉल स्पर्धा, भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मंबई– दि.१० ते १४ मार्च २०२०
८. रामेश्वर विद्यामंदिर उत्तन, भाईंदर पश्चिम तर्फे आयोजित क्रीडा स्पर्धा, दि.३० ऑगष्ट २०१९.
९. दी स्टीफन हायस्कूल फॉर दी डीफ ॲड ऑफसिसच्या बहि-या व मुक्या विद्यार्थ्यांच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे अयोजन, दि.२० सप्टेंबर २०१९
१०. वार्षिक जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा मुंबई जिल्हा क्रीडा अधिकारी , विद्यापीठ क्रीडा संकूल मरीन लाईन्स, दि.३ ते ८ ऑक्टोबर २०१९
११. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई शहर आयोजित बाल महोत्सवप्रसंगी आयोजित बालगृहातील अनाथ मुंलांच्या क्रीडा स्पर्धा दि.२० ते २२ डिसेंबर २०१९
१२. कै.वसंत देसाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी पार्क, दादर येथे अयोजित सामूहिक गीतगायन कार्यक्रमात बीपीएढ प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग, दि.२६ डिसेंबर २०१९
१३. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व महाराष्ट्र राज्य ॲम्यॅच्युअर जिम्नॅस्टिक्स असो.च्या संयुक्त विद्यमाने स्पोर्टस् व्हिलेज, नवी मुंबई येथे आयोजित जिम्नॅस्टिक्स स्पर्धा आयोजनात सक्रीय सहभाग, दि. १ व २ फेब्रुवारी २०२०
१४. विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास विभाग, कोकण विभागद्वारा आयोजित विभागीय स्तरांवरील चाचा नेहरू बाल महोत्सवानिमित्त कबड्डी, खो-खो, कॅरम, बुध्दीबळ, ॲथलेटिक्स स्पर्धा आयोजनात सहभाग स्थळ-ससुन औद्योगिक शाळा, माहिम, मुंबई-१६, दि. १९,२० व २१ जानेवारी २०२०
१५. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आयोजित चाचा नेहरू बाल महोत्व २०१९-२० अनाथ, निराधार व उन्मार्गी मुलांच्या क्रीडा स्पर्धा चेंबूर चिल्डन होम, मानखूर्द, दि.१० ते १२ डिसेंबर २०१९.
१६. 'मशाल' संस्थेच्या मारिया इंग्लिश हायस्कूल व ज्यु. कॉलेज, सायन , मुंबईद्वारा आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा, आनंद नारायण दळवी क्रीडांगण, सायन, दि.४ डिसेंबर २०१९

१७. महाराष्ट्र राज्य ॲमॅच्युअर अक्वॅटीक असोसिएशनद्वारा आयोजित ५८ वी संक रॉक गेटवे जलतरण स्पर्धा २०१२०, गेट वे ऑफ इंडिया, मुंबई- दि.१ मार्च २०२०

## १.२४ शारीरिक शिक्षण संशोधन केंद्राचे कार्य

महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सर्वप्रथम १९९६ साली सुरू केलेल्या संशोधन केंद्रातून आजपर्यंत एकूण ५१ संशोधकांनी आपले संशोधन कार्य पूर्ण करून मुंबई विद्यापीठाची शारीरिक शिक्षण विषयाची विद्यावाचस्पती [पी.एच.डी.] पदवी प्राप्त केली आहे. अहवालसाली संशोधन केंद्रात ३० संशोधक/विद्यार्थी संशोधनात्मक कार्य करीत होते. त्यापैकी वर्षभरात खालील २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी प्राप्त झाली---

१. श्री.मिलिंद मधुकर जाधव
२. श्री.दिपक पाटील

## १.२५ अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr.No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia please specify whether it was a Seminar/ Conference/Symposis as the case may be) | Name of the Organiser | Date & Place | Title of the Paper presented/read |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Dr. Dhakne | State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S college of physical education wadala Mumbai | 4th November to 9th November 2019 | Participated |
| 2. | Dr. G.K. Dhokrat | State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S college of physical education wadala Mumbai | 4th November to 9th November 2019 | Participated |
| 3. | Dr. J.M. Hotkar | State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S college of physical education wadala Mumbai | 4th November to 9th November 2019 | Participated |
| 4. | Dr. N.O. Joshi | 1) Practice of Science in Sports | GAYO Fitness Academy BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 | 12$^{th}$ October – 13$^{th}$ October 2019, Wadala, Mumbai | Participated |
| | | 2) State level workshop on Research Methodology and statistical analysis in Physical Education and Sports | BPCA'S college of Physical Education, Wadala, Mumbai-31 | 4th November to 9th November 2019 | Participated |
| | | 3) International Conference on Physical Education and Sports Science 2020" from | Department of Arts (Physical Education), Manipal University Jaipur | 9th – 11th January 2020 | Participated, Presented Paper & Poster |
| 5. | Dr. S.N. Chougule | 1) National Seminar on Anti-Doping, Physical Education, Sports injuries and Orthopedic Treatment in sports. ISBN: 978-93-5361-842-1. Pp.09-11 | AURO University, Surat, Gujarat, India | July 13-14, 2019 | Paper Presented :**Doping In Sports; A Cause Of Concern** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2) State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S college of physical education wadala Mumbai | 4th November to 9th November 2019 | --------- |
| | | 3) National Conference on Psychological Contributions in Sustainable Human Development in Sports, Organizations & Community Health | Department of Psychology, Physical education & Sports and Home Science | 20th -21st December, 2019 | Paper Presented : **Yamas and Niyamas: Ticket to Inner Peace and Happiness** |
| | | 4) Inter Disciplinary International Conference on Academic Research and Innovation in Teaching & Arising Inclination in Professional Education | | 27th- 28th , December 2019 | Paper Presented: **In dia Sports Policies: A Window For Better Performance At Olympic** |
| | | 5) Scientific International Conference on Physical Education and Allied Sciences on the theme "Holistic Development for Excellence in Sport Performance, Health & Well Being", | S.S. Dempo College of Commerce & Economics Cujira, Bambolim, Goa | 27th – 28th February, 2020 | Paper Published with a title **"Generalized Anxiety Disorder – A Major Issue** |
| 6. | Dr. K.K. Asai | 1) State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S College Of Physical Education | 4th November to 9th November 2019, Wadala, Mumbai | Participated |
| 7. | Dr. K.J. Maru | 1) Practice of Science in Sports | GAYO Fitness Academy BPCA's College of Physical Education | 12th October – 13th October 2019, Wadala, Mumbai | Participated |
| | | 2) State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S College Of Physical Education | 4th November to 9th November 2019, Wadala, Mumbai | Participated |
| 8. | Dr. R.C. Kawade | 1) State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S College Of Physical Education | 4th November to 9th November 2019, Wadala, Mumbai | Participated |
| | | 2) National workshop on career dimension in physical education and sports sciences | Organized by Iqac and Gymkhana and sports committee. | 15th February 2020, Gurukul college of commerce Ghatkopar | Participated |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 3) National seminar cum workshop on physical education, sports and Yoga | Jointly organized- by Department of physical education University of Mumbai and Niranjan Majithin college of commerce kandivali | 3rd march 2020, Kalina Mumbai | Participated |
| 9. | Dr. R.N. Shelke | 1) State level workshop on Research Methodology and statistical analysis in physical education and sports | BPCA'S College Of Physical Education | 4th November to 9th November 2019, wadala Mumbai | Participated |
| | | 2) National Seminar cum Workshop on Physical Education, Sports and Yoga | Dept. of Physical Education, Santacruz (East), University of Mumbai & Niranjana Majithia College of Commerce, Kandivali (West) | 3rd March,2020, Kalina Mumbai | Participated |
| **10.** | Mrs. M. A. Samant (Librarian) | State Level Workshop On Research Methodology & Statistical Analysis In Physical Education & Sports | B.P.C.A'S College Of Physical Education | 04.11.2019 To 09.11.2019Wadala, Mumbai | Participated |
| | | Use Of e Content Development Tools & Techniques In Teaching &Learning Process | J.B.S.P.Sansta's Changu Kana Thakur Arts,Commerce & Science College | 29.01.2020 to 30.01.2020 New Panvel | Participated |
| | | National Seminar Cum Workshop On Physical Education ,Sports & Yoga | Department of Physical Education,University of Mumbai & Niranjan Majithia College Of Commerce | 03.03.2020 | Participated |

**ब.शिक्षकांद्वारे प्रकाशन कार्य :**

अहवालसाली महाविद्यालयाच्या खालील शिक्षकांनी खालील महत्वपूर्ण लेखन / प्रकाशन कार्य केले.

1 **Dr. G.K.Dhokrat,** Affect of Postural Deformities on Positive Mental Health with Reference to Adolescent Indian Boys **March-2020,**

2 **Dr. S. N. Chougule** "National Seminar on Anti-Doping, Physical Education, Sports injuries and Orthopedic Treatment in sports" AURO University, Surat, Gujarat, India, July 13-14, 2019 . Paper Presented :Doping In Sports; A Cause Of Concern **ISBN: 978-93-5361-842-1. Pp.09-11,**

**Dr. S. N. Chougule** "National Conference on Psychological Contributions in Sustainable Human Development in Sports, Organizations & Community Health ", Department of Psychology, Physical education & Sports and Home Science, $20^{th}$ -$21^{st}$ December, 2019, Paper Presented : Yamas and Niyamas: Ticket to Inner Peace and Happiness

**Dr. S. N. Chougule** “Inter Disciplinary International Conference on Academic Research and Innovation in Teaching & Arising Inclination in Professional Education”, 27th- 28th , December 2019 Paper Presented: India Sports Policies: A Window For Better Performance At Olympic

**Dr. S. N. Chougule** “Scientific International Conference on Physical Education and Allied Sciences on the theme “Holistic Development for Excellence in Sport Performance, Health & Well Being”, S.S. Dempo College of Commerce & Economics Cujira, Bambolim, Goa, 27th – 28th February, 2020, Paper Published with a title “Generalized Anxiety Disorder – A Major Issue

3 **Dr. K.J. Maru**, “National Conference on Physical Education and Sports Science ”, Manipal University, Jaipur, 9th – 11th January 2020, Effect of Pranayama and Mudras on Cardiovascular Endurance and Peak Expiratory Flow Rate of Junior College Students

**Dr. K.J. Maru**, “National Conference on Physical Education and Sports Science, Manipal University, Jaipur, 9th – 11th January 2020, Effect of Yoga Practices on General Well-Being of Senior Wing Girls of National Cadet Corps

4 **Dr. N.O. Joshi**, Effect of specific Training Programme on Motor Fitness Components and Aggression of Kabaddi Players, National Conference on Physical Education and Sports Science, Manipal University, Jaipur, held between 9-11th January, 2020

5 **Dr. N.O. Joshi**, Efficacy of Pranayama on Anxiety of Physical Education Female Students. National Conference on Physical Education and Sports Science, Manipal University, Jaipur, 9th – 11th January 2020

क. शिक्षकांचे विशेष कार्य

1. Dr. G.V.. Pargaonkar, worked as ***IQAC Member*** of Dr. Amberdkar College of Commerce and Economics, Wadala, Mumbai – 31.
2. Dr. G.V. Pargaonkar, worked as ***Member (Subject Expert) on Research and Recognition Committee*** for the subject of Physical Education under the faculty of Inter-disciplinary studies of Savitribai Phule Pune University and the University of Mumbai.
3. Dr. G.V. Pargaonkar, worked ***on scrutiny /committee*** of ***Shivaji University for Director of Sports & Physical Education*** post.
4. Dr. G.V. Pargaonkar, worked as Expert to conduct ***External Academic Audit of LNIPE, Gwalior (Autonomous Institution & Deemed to be University)*** on 6th & 7th August, 2019.
5. Dr. G.V. Pargaonkar, worked as Chairperson of the Physical verification committee constituted by UGC for construction of sports infrastructure and other bulding projects by Agarwal college, Ballabgarh, Haryana under the scheme of Infrastructure and visited on 25th December, 2019.
6. Dr. G.V. Pargaonkar, attended ***Silver Jubilee Celebration of NAAC and Lecutre seris on “ Assessment of different types of Higher Eduction Institutions, Commodities and differences” followed by the address of Hon’ble Vice Preident of India Shri M. Venkaiah Naidu held at NAAC office of Rajbhavan, Bengluru*** on 6th & 7th January, 2020.
7. Dr. G.V. Pargaonkar, worked as Higher Education Expert recommended by the Vice Chancellor of University of Mumbai on the Selection panel for the appointment of Principal for Deviprasad management college of Mass Media Studies, Malad(W.), Mumbai, on 14th December, 2019.
8. Dr. G.V. Pargaonkar, worked as member of Adhoc Bos in Physical Education of the University of Mumbai.
9. Dr. G.V. Pargaonkar, worked as ***convener of the scrutiny committies of the University of Mumbai appointed for opening new colleges as well as for permanent affiliation***.
10. Dr. G.K. Dhokrat, worked as member of Adhoc Bos in Physical Education of the University of Mumbai

11 Dr. N.O. Joshi worked as ***Chairperson at the International Conference*** on Sports Psychology & Yogic Sciences held between 16-17th February, 2019 Organized by **Department of Physical Education & Sports & IQAC**, Dr. Ambedkar College, Deekshabhoomi, Nagpur.

12 Dr. N.O. Joshi , Appointed as an examiner by NATIONAL SPORTS UNIVERSITY, IMPHAL, MANIPUR (Government of India, Ministry of Youth Affairs and Sports) (Central University) for the Semester Examination of II & III Semester 2018-19 (May) B. Sc (Sports Coaching), B.P.E.S, M.A. (Sports Psychology) in May, 2019.
Was invited as Resource Person & Worked as Chair Person at National Conference on Physical Education and Sports Science, Manipal University, Jaipur, 9th - 11th January 2020

13 Dr. S N. Chougule Diploma in Yogic Therapy, Natural Living & Naturopathy, 2019-2020

14 Dr. Maru- Research Advisory Committee
Subject Expert for Gokhale Education Society's College of Education and Research, Parel, Mumbai, 2019-2020

15 Dr. Maru , Chair Person National Conference on Physical Education and Sports Science, Manipal University, Jaipur, 9th - 11th January 2020

16 Dr. Maru Refresher Course(Physical Education and Sports Sciences), ASC-HRDC Sant Gadge Baba Amravati University, Amravati, 2nd March – 16th March 2020

17 Dr. Shelke- Indian Scientific Massage Training Class organised by Nana Palkar Smriti Sawati, 13-04-2019

18 Mrs. Samant - Refresher Course In Library & Information Science organised by Aligarh Muslim YUniversity,Aligarh, 20.09. 2019 To 04.10.2019

19 Mrs. Samant - ARPIT ONLINE COURSE Emerging Trends & Technologies in Library & Information Services organised by SWAYAM, 16.02.2020

## १.२६ आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेतील विद्यार्थी सहभाग

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आंतर-महाविद्यालयीन राज्य, राष्ट्रीय व आंतर-विद्यापीठीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेवून उल्लेखनीय कामगिरी केली-

### अ. वैयक्तिक कामगिरी

- **हॅण्डबॉल/ सॉप्टबॉल/क्रिकेट**

१. /पाटील करीश्मा गुणाजी [बीपीएड - द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत सांघिक दुसरे स्थान
  - आंतरमहाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सांघिक आठवे स्थान
  - सॉप्टबॉल, क्रिकेट आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग

- **हॅण्डबॉल/ सॉप्टबॉल/क्रिकेट**

२. /राधिका अजय ठक्कर [बीपीएड - द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत सांघिक दुसरे स्थान
  - आंतरमहाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सांघिक आठवे स्थान
  - सॉप्टबॉल, क्रिकेट आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग

- **सॉप्टबॉल**

३. अक्षय अनिल कदम [बीपीएड - द्वितीय वर्ष]
  - आंतरविद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग व संघ नेतृत्व [कॅप्टन]

- **ॲथलेटिक्स**

४. जाधव हर्षल एकनाथ [बीपीएड - द्वितीय वर्ष]
  - आंतरविद्यापीठ डिकॅथलॉन स्पर्धेत तिसरे स्थान
  - आंतरविद्यापीठ ४x१०० मीटर रिले स्पर्धेत पहिले स्थान

- **मल्लखांब**

५. आदित्य गोकूल पाटील [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेत दुसरे स्थान
  - आंतरविद्यापीठ स्पर्धेत सांघिक पहिले स्थान
  - आंतरमहाविद्यालयीन रोप मल्लखांब स्पर्धेत दुसरे स्थान

- **हॅण्डबॉल**

६. ओंकार विठ्ठल नन्हे [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत चतुर्थ स्थान
  - आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग
  - अश्वमेध हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग

- **ज्युडो/ आर्चरी**

७. प्रफुल्ल यशवंत सिंग [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत दुसरे स्थान
  - आंतरमहाविद्यालयीन आर्चरी स्पर्धेत दुसरे स्थान

- **योग**

८. /शिवानी उत्तम मुनगेकर [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन योग स्पर्धेत चतुर्थ स्थान
  - आंतरविद्यापीठ योग स्पर्धेत सहभाग

- **हॅण्डबॉल**

९. /अश्लेषा जगन वासवे [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत दुसरे स्थान
  - आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग
  - अश्वमेध हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग

- **ॲथलेटिक्स**

१०. सत्येंद्र रविंद्रप्रसाद सिंग [बीपीएड – द्वितीय वर्ष]
  - आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स १०० मीटर स्पर्धेत व २०० मीटर स्पर्धेत सहावे स्थान
  - आंतरविद्यापीठ ४x१०० मीटर रिले स्पर्धेत पहिले स्थान

## ब. सांघिक कामगिरी

- **बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**

  आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत महिला संघ दुसरे स्थान.

  १. काजल भूसारे
  २. मेघना खेडेकर
  ३. नेहा नवरत
  ४. पुजा पाल
  ५. करीश्मा पाटील
  ६. मोहिनी पवार
  ७. मयुरी सिंगटकर
  ८. राधिका ठक्कर
  ९. प्रणाली चव्हाण
  १०.स्नेहा कटकधोड
  ११.विनी लोपीस
  १२.अश्लेषा वासवे
  १३.समृध्दी पवार
  १४.तेजल सोलंकी
  १५.स्नेहा मौर्य
  १६.सनस दर्शना

- **बीपीएड/एमपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**
  आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत महिला संघ चतुर्थ स्थान.
  १. खेडकर मेघना
  २. प्राची माहिमकर
  ३. पाल पुजा
  ४. नम्रता सकपाळ
  ५. शिंदे गौरी
  ६. पवार समृध्दी
  ७. ठक्कर राधिका

- **बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**
  आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धेत महिला संघ चतुर्थ स्थान.
  १. अश्विनी गायकर
  २. लुहार कैलाशकुमारी
  ३. नेहा नवरत
  ४. यादव निशा
  ५. शिवानी मुनगेकर
  ६. श्रेयसी पवार

- **बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**
  आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत महिला संघ आठवे स्थान.
  १.भुसारे काजल
  २.देढिया देवांसी
  ३.गायकर अश्विनी
  ४.कामती अनुराधा
  ५.प्राची माहिमकर
  ६.मोरे अस्मिता
  ७.नेहा नवरत
  ८.पाल पुजा
  ९.पाटील करिश्मा
  १०.पवार मोहिनी
  ११.नम्रता सकपाल
  १२.मयुरी सिंगटकर
  १३.ठक्कर राधिका
  ४.सोलंकी तेजल

- **४ X १०० मिटर रिले – आंतर महाविद्यालयीन, पुरूष संघ तृतीय क्रमांक**
  १. राठोड अजय
  २. जाधव हर्षद
  ३. तिवारी शामसुंदर
  ४. सत्येंद्र सिंग

**क. इतर सहभाग**

- आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयातील पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत महाविद्यालयातील पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत महाविद्यालयातील पुरूष संघाचा सहभाग.

अहवालसाली महाविद्यालयातील एकूण ४९ विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध खेळातील वैशिष्टयपूर्ण कामगिरीबद्दल विद्यापीठीय नियम ०.२२६ नुसार त्यांना जास्तीचे १० गुण मिळण्यास पात्र ठरले.

**१.२७ गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत/शिष्यवृत्ती**

**मराठा भगिनी समाज शिष्यवृत्ती–** दि.२६ जानेवारी २०२० रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय शेटे यांचे शुभहस्ते महाविद्यालयाच्या बी.पी.एड अभ्यासक्रमात शिकणा-या दोन गरीब विद्यार्थीनींस प्रत्येकी रू.५,०००/-[रूपये पाच हजार फक्त] इतकी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आली.

### १.२८ कॅम्पस मुलाखती

अहवालसाली प्रतिवर्षाप्रमाण कोव्हीड-१९ रोगाच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या ताळेबंदीमुळे कॅम्पस मुलाखती होवू शकल्या नाहीत.

### १.२९ माजी विद्यार्थी संघटनेचे कार्य

सन २००२ साली स्थापन करण्यत आलेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेने केलेले कार्य कौतुकास्पद आहे. संघटनेच्या कार्यकारी समितीच्या व सर्वसाधारण सभा वेळोवेळी होवून त्यांच्यात विचारांची देवाण घेवाण झाली. माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने १९९३ सालापासून चालविण्यात येणा-या नियमित क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ यावर्षी सुमारे २०० शालेय मुला-मुलींनी घेतला. आजवर प्रतिवर्षी विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन या शालेय मुलामुलींना घवघवीत यश संपादन केले आहे. क्रीडा केंद्राने २० खेळाडूंनी राज्य तर १५ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरापर्यंत नेण्याची मजल गाठली. सदर प्रशिक्षण केंद्रात प्रामुख्याने सर्वश्री दादासाहेब शिंदे, राजेंद्र शेळके, देवेंद्र पाटील, प्रेमानंद नाईक व संदीप चव्हाण हे माजी विद्यार्थी आपला अमुल्य वेळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली कौतुकास्पद कामगिरी करीत आहेत. अहवालसाली माजी विद्यार्थी संघटनेने 'कमवा व शिका' योजने अंतर्गत सरीता पाल, हेमांगी कापुरे, समीक्षा कोरे, भुषण भोईर, नितीन टोकरे व प्रशांत दामोदरे या गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली. संघटनेत अहवालसाली ७७ नविन सभासदांची भर पडली. सनन्वयक म्हणून डॉ.जे.एम.होटकर यांनी उत्कृष्ठ काम केले.

### १.३० विद्यापीठ परीक्षा निकाल

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात झालेल्या मुंबई विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा [२०१७-१९] निकाल १००% लागला. तसेच एम. पी.एड. [२०१६-२०१८] [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमासाठी बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला.

तात्पर्य, दिवसेंदिवस मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा उंचावत आहे. आजवर मंडळाच्या या महाविद्यालयातून तयार झालेले सुमारे ४,००० शिक्षक देशाच्या कानाकोप-यात अनेकविध शाळा-महाविद्यालयातून यशस्वीरित्या कार्य करीत आहे. आज १०० टक्के विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने व प्राधान्याने नोक-या मिळताहेत यावरून महाविद्यालयाची गुणवत्ता सिध्द होते. ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भुषणावह व अभिमानास्पद आहे.

### १.३१ वार्षिक पारितोषिक वितरण व दीक्षांत समारंभ –

कोरोना -१९ या महामारीमुळे शासन व विद्यापीठाद्वारे जाहिर करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे प्रतिवर्षाप्रमाणे अहवालसाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व दिक्षांत समारंभ होऊ शकला नाही.

### १.३२ राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान [रूसा] चे अनुदान –

महाविद्यालयाने उच्च शिक्षणातील गुणवत्ता उत्कृष्ठरित्या संपादन केल्याने अहवालसाली महाविद्यालयाने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दि.१७ सप्टेंबर २०१८ च्या सभेत महाविद्यालयाची भौतिक सोयीसुविधा विकसित करण्यासाठी रूपये २.०० कोटी इतक्या अनुदानासाठी निवड करण्यात आली. त्यापैकी रूपये एक कोटी इतके अनुदान महाविद्यालयास दि.२० नोव्हेंबर २०१९ रोजी अदा करण्यात आले असून विकास कामे हाती घेण्यात येणार आहेत. अशा प्रकारच्या अनुदानास देशातील एकूण ४७२ तर राज्यातील केवळ १४ महाविद्यालये पात्र ठरली आहेत. सदर अनुदानामुळे आगामी काळात महाविद्यालयात उच्च दर्जाच्या भौतिक सोयीसुविधा उपलबध होऊन शैक्षणिक गुणवत्ता अधिक वाढीस लागणार आहे.

## २. शालेय लेझीम स्पर्धा

कै.दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या शालेय लेझीम स्पर्धा प्रतिवर्षाप्रमाणे दि.२८ जानेवारी, २०२० रोजी झाल्या. स्पर्धेत ९ शाळांतील सुमारे ८९० शालेय मुला-मुलींनी भाग घेतला. या स्पर्धेत एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण या शाळेने प्रथम क्रमांक पटकावून कै.दत्ताराम लाड चषक, स्मृतिचिन्ह व पाच हजार रूपयांचे बक्षीस मिळविले. श्रीमती जे.बी.खोत हायस्कूल नं.२, बोरीवली (पूर्व) या शाळेने द्वितीय क्रमांक मिळवून स्मृतिचिन्ह व तीन हजार रूपयांचे बक्षीस मिळविले. शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, अभ्युदयनगर, काळाचौकी या शाळेने तृतीय क्रमांकासह दोन हजार रूपये व स्मृतिचिन्ह पटकावले. सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल या शाळांनी चतुर्थ क्रमांकाचे उत्तेजनार्थ स्मृतिचिन्ह मिळविले व सहभागी झालेल्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना

सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. त्याचबरोबर उत्कृष्ठ ढोलवादक- कु.सोहम केळवलकर, आर.जे. एम.डी.एस.एस. इंग्लिश स्कूल, जोगेश्वरी (पूर्व), उत्कृष्ठ हलगीवादक- कु.सिध्देश निवलकर, सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल. उत्कृष्ठ ताशावादक- कु.अमोल गायकवाड, एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण. उत्कृष्ठ तुतारीवादक- कु.अमित बाळासाहेब गजरे, शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, अभ्युदयनगर, काळाचौकी त्याद्वारा त्यांच्या नैपुण्याची, उत्साहाची प्रशंसा करण्यात आली.

स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी विशेष अतिथी श्रीमती गोम्स सुसाना, प्राचार्य डॉ.डिसिल्वा हायस्कूल, दादर तसेच मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय बाबूराव शेटे, प्रमुख कार्यवाह श्री.दिपक शेटे, मंडळाचे सदस्य श्री.संग्रामसिंह शेटे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य श्रीमती नलिनी फडणीस, श्री.शामराव मोरे, श्रीमती जयश्रीताई माने, श्री.दिपक कांदळगांवकर, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

स्पर्धेबाबत आपला अभिप्राय देतांना लेझीम तज्ञ आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पारगांवकर यांनी सर्व शालेय विद्यार्थी व शिक्षकांना स्पर्धेबाबत मार्गदर्शन केले व सगळयांचे कौतुक केले. तसेच लेझीम स्पर्धेसाठी प्रतिसाद वाढत असला आणि त्याचा दर्जाही सुधारत असला तरी त्याची फिल्मी लेझीमकडे वाटचाल न होता लेझीमचा पारंपारिक बाज व नजाकत टिकविण्याची शिक्षक बंधु-भगिनींनी भविष्यात काळजी घ्यावी. तसेच लेझीमची ढोल, ताशा, झांज, घुमकं, तुतारी ही मुळ वाद्ये वापरावीत तसेच जास्तीत जास्त शाळांनी सहभाग घ्यावा. तसेच गुणवंत शिक्षकांना घडयाळ, शाल व श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले. गुणवंत शिक्षकांमध्ये श्रीमती विणा खवळे, शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, अभ्युदयनगर, काळाचौकी श्री.अशोक रामभाऊ शिरसाठ, एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण. विशेष अतिथी श्रीमती गोम्स सुसाना, प्राचार्य डॉ.डिसिल्वा हायस्कूल, दादर यांनाही घडयाळ, शाल व श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले.

तसेच मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय बाबूराव शेटे यांनी **पुढील होणा-या स्पर्धेसाठी बक्षिसांच्या रकमेत वाढ केल्याचे घोषित केले. प्रथम कमांक रोख बक्षिस रक्कम रू. १०,०००/-, द्वितीय कमांक रोख बक्षिस रक्कम रू.६,०००/- , तृतीय कमांक रोख बक्षिस रक्कम रू. ४,०००/-.** एकूणच स्पर्धा खूपच रंगल्या. पुढेही त्या अशाच रंगत रहाणार यात शंकाच नाही. स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे -

| क्र. | ‘kkGsps ukao | xq.k 100 iSdh |
|---|---|---|
| १ | एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण | ७९.६६ |
| २ | श्रीमती जे.बी. खोत हायस्कूल नं.२, बोरीवली | ७५.०० |
| ३ | शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, काळाचौकी | ७३.३३ |
| ४ | सोशल सर्व्हिस लीग, परेल | ६२.३३ |
| ५ | आय.ई.एस. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर | ६१.०० |
| ६ | नालंदा पब्लिक स्कूल, मुलुंड | ५९.६६ |
| ६ | आर.जे.एम.डी.एस.एस. इंग्लिश स्कूल, जोगेश्वरी | ५९.६६ |
| ७ | रामेश्वर विद्यामंदिर, वाकोला | ५९.०० |
| ८ | नाडकर्णी पार्क प्राथमिक मराठी शाळा, वडाळा | ५५.३३ |
| ९ | भारतीय सैनिकी विद्यालय, खडवली, कल्याण | ५४.३३ |

## ३. हिंद ट्रॉफी आंतर शालेय सामने व गौरव समारंभ-

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळद्वारा आयोजित ७७ व्या हिंद ट्रॉफी आंतरशालेय सामने दि. ३ ते ६ जानेवारी,२०२० या कालावधीत करण्यात आले होते. सामन्यांच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे, मंडळाच्या कार्यकारी समितीच्या जेष्ठ सदस्या श्रीमती नलिनी फडणीस हिंद ट्रॉफी आयोजन समितीचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, आयोजन समितीचे सचिव डॉ.घनश्याम ढोकरट इत्यादींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या स्पर्धेत एकूण मुलींच्या १९ व मुलांच्या २७ शाळेतील सुमारे १२३८ [मुले-७४४, मुली-४९४] खेळाडूंनी सहभाग घेतला. सदर सामन्याच्या पारीतोषिक वितरण समारंभ सोमवार दि.६ जानेवारी २०२० रोजी प्र.पाहूणे सन्मानीय डॉ.मन्मथ घरोटे, मंडळाचे खजिनदार श्री.शामराव मोरे, संचालक, दि सातारा सहकारी बॅंक तसेच श्रीमती नलिनी फडणीस, सभासद, मुं.शा.शि.मंडळ यांच्या उपस्थिती पार पडला. आंतरशालेय मुला-मुलींच्या कबड्डी, खो-खो व लंगडी या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-

**खो-खो [मुले]** -प्रथम कमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

द्वितीय क्रमांक - रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने
तृतीय क्रमांक - नंदादिप विद्यालय, गोरेगांव
चतुर्थ क्रमांक - के.एम.एस.डॉ.शिरोडकर हायस्कूल, परेल
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.सृजल जाईगडे- महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

**खो-खो [मुली] -** प्रथम क्रमांक -आई.एस.न्यु इंग्लिश स्कूल, वांद्रे
द्वितीय क्रमांक-रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने
तृतीय क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
चतुर्थ क्रमांक - श्री गणेश विद्यालय, इंग्रजी, वडाळा
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.साक्षी पार्सेकर- आई.एस.न्यु इंग्लिश स्कूल, वांद्रे

**कबड्डी [मुले]** - प्रथम क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, मराठी, दादर
द्वितीय क्रमांक -डॉ.ॲन्टिनियो डिस्लिव्हा, दादर
तृतीय क्रमांक - मानवारी हायस्कूल, मुंबई
चतुर्थ क्रमांक - आदर्श विद्यालय, इंग्रजी माध्यम, गोरेगांव
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.विशाल लाड-शारदाश्रम विद्यामंदिर, मराठी, दादर

**कबड्डी [मुली]** -प्रथम क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
द्वितीय क्रमांक - सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल
तृतीय क्रमांक - गौरीदत्त मिततल विद्यालय, सायन
चतुर्थ क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, इंग्रजी, दादर
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.प्रतिक्षा सर्वसाने- महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

**लंगडी [मुले]** - **खो-खो [मुली] -** प्रथम क्रमांक - सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल
द्वितीय क्रमांक- श्री गणेश विद्यालय, मराठी, वडाळा
तृतीय क्रमांक - सरस्वती विद्यामंदिर, घाटकोपर
चतुर्थ क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, इंग्रजी, दादर
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.जनार्दन सावंत-सोशल सर्व्हीस लीग हायस्कूल,परेल

**लंगडी [मुली]** - प्रथम क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
द्वितीय क्रमांक - सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल
तृतीय क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, मराठी, दादर
चतुर्थ क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, इंग्रजी, दादर
उत्कृष्ठ खेळाडू म्हणून कु.कणेरी तन्वी लवू, महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे

सन २०१९-२०२० या वर्षातील **टोपीवाला हिंद ट्रॉफीची मानकरी शाळा अनुक्रमे शारदाश्रम विद्यामंदिर, मराठी, दादर, महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे, सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल, परेल असून राणी लक्ष्मीबाई हिंद ट्रॉफीची मानकरी शाळा महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे, ही शाळा झाली.** हिंद ट्रॉफी पटकावणा-या शाळेस प्रत्येकी रोख रू. २,०००/- व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. सदर स्पर्धेत सर्व खेळातील प्रथम क्रमांक पटकाविणा-या शाळेस रोख रू.१,०००/- व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. द्वितीय क्रमांक पटकावणा-या शाळेस स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच उत्कृष्ठ खेळाडूंना डॉ. काशिनाथ दादाराव ढोकरट यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख रू.५००/- व स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.

तसेच मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी तसेच इतर मान्यवर व महाविद्यालयाचे शिक्षकवृंद हे उपस्थित होते. सदर स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता मंडळाचे अध्यक्ष श्री.संजय शेटे व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा सचिव डॉ.घनश्याम ढोकरट यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने केली.

## ४. कबड्डी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१९-२० ची मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा व्यावसायिक विशेषगट, प्रथम व द्वितीय श्रेणी, स्थानिक प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणी, कुमार-कुमारी गट मुले-मुली तसेच महिला स्थानिक व व्यावसायिक [किशोर व किशोरी विभाग] [कुमार-कुमारी विभाग] व उर्वरीत सामने दि.१५ ते २७ फेब्रुवारी,२०२० या कालावधीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या सहकार्याने भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे घेण्यात आल्या. प्रतिदिनी सहा क्रिडांगणावर सायं.७ ते १० या वेळेत प्रकाश झोतात सामने झाले. स्पर्धेचे उद्‌घाटन मुंबई शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी कबड्डी संघटनेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते.

## ५. होळी उत्सवाचे आयोजन

मार्च महिन्यात संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे यांनी होळीचे पुजन करून होळी पेटविली. त्यावेळी संस्थेचे पदाधिकारी श्री.दिपक शेटे, श्रीमती अनुराधा शेटे, संग्रामसिंह शेटे, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे पालक, विद्यार्थी, स्थानिक नागरिक, डॉ.गो.वि. पारगांवकर इत्यादी मोठया संख्येने उपस्थित होते.

## ६. योग अभ्यास केंद्र

संस्थेच्यावतीने भारतीय क्रीडा मंदिरात प्राचार्य गो.वि. पारगांवकर यांच्या पुढाकारामुळे व मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या योगाभ्यास केंद्रामध्ये श्री.दिलिप पोदार, श्रीमती सुनिता बसिन व श्रीमती हर्षा निसार यांनी योग शिक्षक म्हणून शिक्षकांचे कार्य करून संस्थेस सहकार्य केले. रोज सकाळी ६.३० ते ७.३० यावेळेत चालविण्यात आलेल्या योगासन वर्गाचा लाभ सुमारे ३० ते ३५ स्थानिक स्त्री-पुरूषांनी घेतला.

## ७. व्यायामशाळा

अहवालसाली भारतीय क्रीडा मंदिराच्या दुस-या मजल्यावर संस्थेद्वारे स्थापन करण्यात आलेल्या अद्यावत व्यायामशाळेचा लाभ महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी-विद्यार्थीनी व सुमारे १५० स्थानिक पुरूष व महिलांनी घेतला. अहवालसाली श्री.अली व श्री.असलम शेख यांनी प्रमुख व्यायाम प्रशिक्षक म्हणून काम केले.

## ८. इतर संस्थांचे क्रीडा विषयक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या भारतीय क्रीडा मंदिराचे स्टेडियम, क्रीडांगण, व्यायाम शाळा आणि वसतिगृह यांचा खेळ, शिक्षण, तसेच समाज व राष्ट्रोपयोगी कार्यासाठी जास्तीत जास्त उपयोग व्हावा यासाठी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ सतत प्रयत्नशील आहे.

अहवालसाली संस्थेच्या भारतीय क्रीडा मंदिरात विविध क्रीडा संस्था, मंडळे, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, मुंबई महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर आणि महाराष्ट्र शासन यांनी आयोजित केलेल्या खालील स्पर्धा आणि कार्यक्रम पार पडले.

१ मुंबई शहर कबड्डी असोसिएशन सर्वसाधारण सभा - दि.३१ ऑगष्ट २०१९
२ दि सातारा सहकारी बॅक मर्यादित, वर्षिक सर्वसाधारण सभा -दि.२१ जूलै, २०१९
३ दि सातारा सहकारी बॅक द्वारा आयोजित कै.बाबुरावजी शेटे २८ वी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम- दि.१९.९.२०१९
४ मुंबई शहर कबड्डी असोसिएशनद्वारा आयोजित जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी- दि. १५ ते १७ फेब्रुवारी २०२०.
५ मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंचवर्ग-पंचपरीक्षा- नोव्हेंबर २०१९
६ आय ई एस शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा- दि.१७ जानेवारी २०२०.
७ मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित टॅलेंट डिसप्ले स्पर्धा -दि.१४ मार्च २०२०
८ म.रा.अ.जि. असो.द्वारा आयोजित ज्युनि/सिनि. आर्टिस्टिक जिम्नॅ निवड स्पर्धा - दि.१४ जानेवारी २०२०.
९ ऑर्चिडस् इंटरनॅशनल स्कूल, कुर्ला वार्षिक क्रीडा स्पर्धा - दि.१४ डिसेंबर २०२०.
१० म.रा.ॲम. जिल्हा असो. आयोजित बालगट राष्ट्रीय जिम्नॅ. सराव शिबिर निवास व भोजन व्यवस्था- दि.२४ ते २६ जून २०१९.
११ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर द्वारा अयोजित शालेय नेटबॉल स्पर्धा दि. २६ सप्टेंबर २०१९.

१२ जिल्हास्तरीय शालेय जिम्नॅस्टिक्स क्रीडा स्पर्धा २०१९-२०२० दि.२८ व २९ सप्टेंबर २०१९ मुं.श.जि.क्रीडा अधिकारी कार्यालय
१३ मुंबई शहर कबड्डी असो. पंचवार्षिक कार्यकारीणी निवडणूक- दि.२५ ऑगष्ट २०१९
१४ अपना सहकारी बॅंक लि., मुंबई पंचवार्षिक निवडणूक - दि.१० सप्टेंबर २०१९
१५ महाराष्ट्र राज्य ॲम्यॅच्युअर जिम्नॅ.असो. निवड स्पर्धा- दि.१ डिसेंबर २०१९
१६ स्पोर्टस कन्सल्ट, मुंबई , आर्टिस्टिक्स जिम्न. -दि.१ व २ फेब्रुवारी २०२०
१७ जिल्हास्तर नेटबॉल स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर- दि.२६ सप्टेंबर २०१९

## ९. श्रध्दांजली:-

अहवालसाली मंडळाशी संबंधित तसेच देशभरातील ज्या नामवंत व थोर व्यक्तींचे निधन झाले, त्या सर्वांना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यात प्रामुख्याने श्री.वीरू देवगण, भारतीय सिनेकलावंत व दिग्दर्शक (दि.27 मे, २०१९), श्री.गिरीश कर्नाड, दक्षिण भारतीय ज्येष्ठ सिनेअभिनेता (दि.10 जून, २०१९), श्री.शंकर दामोदर चव्हाण, निवृत्त वरिष्ठ प्राध्यापक, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वडाळा (दि.13 जून, २०१९),

श्रीमती शिला दिक्षित, वरिष्ठ कॉंग्रेस नेत्या व पूर्व मुख्यमंत्री, दिल्ली (दि.20 जुलै, २०१९), श्री. जयपाल रेड्डी, वरिष्ठ कॉंग्रेस नेते (दि.28 जुलै, २०१९), श्रीमती सुषमा स्वराज, पुर्व विदेश मंत्री व वरिष्ठ बीजेपी नेत्या, (दि.6 ऑगष्ट, २०१९), श्रीमती विद्या सिन्हा , हिंदी सिनेकलावंत (दि.15 ऑगष्ट, २०१९), श्री.अरूण जेटली, पुर्व वित्त मंत्री व खासदार भारत सरकार (दि.24 ऑगष्ट, २०१९), श्री.अब्दूल कादिर, पुर्व पाकिस्तानी क्रिकेटर (दि.6 सप्टेंबर २०१९), श्री.अरूण काकडे, ज्येश्ठ मराठी रंगमंच कलाकार (दि.9 आक्टोंबर, २०१९), श्री.टी.एन. शेषन, पूर्व निवडणूक अधिकारी भारत सरकार (दि.10 नोव्हेंबर, २०१९), श्री.बाूब विलीस, इंग्लिष क्रिकेटर, कॅप्टन ॲण्ड फास्ट बॉलर (दि.4 डिसेंबर, २०१९), श्री.बलबीर सिंग कूल्लर, पूर्व हॉकी खेळाडू व ऑलिम्पिक कास्यपदक विजेता (दि.28 फेब्रुवारी, २०२०),

उक्त नमुद सर्वांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने परमेश्वर चरणी प्रार्थना !!

## १०. आभार

वर्षभरात विविध प्रसंगी विविध क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ञ आणि थोर व्यक्तींनी संस्थेस भेटी देऊन मार्गदर्शन केले तसेच होत असलेल्या संस्थेच्या कार्याचे कौतुक करून आम्हास प्रेरणा दिली. संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन अनेक शाळा, संस्था आणि व्यक्तींनी मंडळास सहकार्य केले. महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालय व संस्थेला अनुदानरूपाने आर्थिक सहकार्य मिळाले. अनेक व्यक्ती आणि संस्थांनी मंडळाच्या उपक्रमांसाठी आर्थिक आधार दिला, त्या सर्वाचे मन:पूर्वक आभार. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा उत्कर्ष आपणा सर्वांवर अवलंबून आहे, याची जाणीव मंडळाला सदैव आहे. बलशाली भारताचे स्वप्न उराशी बाळगून कार्य कारणा-या आणि अमृत महोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करीत असलेल्या आमच्या मुंबई शारीरिक शिक्षण मंडळास आपण भविष्यातही सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,

दिपक बाबूराव शेटे
जनरल सेक्रेटरी,
मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

स.न.वि.वि.

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या ८५ व्या वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभा भारतीय क्रीडा मंदिर, पहिला मजला सभागृह, वडाळा, मुंबई- ३१ येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय:-

१. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

२. सन २०१८-२०१९ चा मंडळाचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०१८-२०१९ चे मंडळाचे वार्षिक जमाखर्च व ताळेबंद तक्ता वाचून मंजूर करणे.

४. सन २०१९-२०२० सालासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करून मंजूर करणे.

५. सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे.

६. कार्यकारी समितीच्या संमतीने आलेल्या सूचनांचा विचार करणे व अध्यक्षांचे परवानगीने येणारी आयत्या वेळेची कामे.

सूचना:-

१. गणसंख्येच्या अभावी सदर सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी तहकुब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटांनंतर सुरू होईल. अशाप्रकारे तहकुब होवून सुरू झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता रहाणार नाही.

२. ज्या सभासदांना सर्वसाधारण सभेपुढे सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपुर्वी पाच दिवस अगोदर सूचक अनुमोदकाच्या सहीनिशी मंडळाच्या कचेरीत लेखी पाठविण्याची कृपा करावी. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक: ३० ऑगष्ट २०१९

आपला नम्र,

श्री.दिपक बाबुराव शेटे
प्रमुख कार्यवाह

कचेरी: भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव–वडाळा क्रॉस रोड, वडाळा, मुंबई–400031